


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. ८ मार्च २०२४ । वर्ष : २२ वे अंक : १५९ वा किंमत : ५ रुपये पाने ८


# लॉबिंग...गाजर...मेसेजचे दावे...

- सोलापूर, माढा उमेदवारीवरुन इच्छुकांसह समर्थक फुल्ल टेंन्शनमध्ये
- गॉडफादरकडे प्रचंड लॉबिंग; दिल्ली-मुंबईच्या घोडामोडींवर बारीक लक्ष
- जेवण गोड लागेना, झोपही उडाली; मोबाईलच्या स्क्रीनवर सतत नजर



**सोलापूर/खास प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीच्या जागा वाटपावरुन भाजप, शिवसेना एकनाथ शिंदे गट, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे, वंचित, राष्ट्रवादी शरद पवार गट, राष्ट्रवादी अजित पवार गट या प्रमुख पक्षांमध्ये प्रचंड रस्सीखेचचे धूमशान सुरु आहे. पडद्यावर आणि पडद्यामागे मोठ्या हालचाली सुरु आहेत. रात्रंदिवस जोरसे बैठका चालू आहेत. पक्षांच्या वरिष्ठांमध्ये तुफानी राजकीय गरमी वाढली आहे. अशातच सोलापूर आणि माढा लोकसभेच्या आखाड्यात उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्यांसह समर्थकांमध्ये प्रचंड टेन्शन आहे.**

दरम्यान, या खेपेस कोणत्याही परिस्थितीत उमेदवारीचे तिकिट आपल्यालाच मिळाले पाहिजे, या महत्वाकांक्षेतून इच्छुकांनी आपल्या गॉडफादरांकडे प्रचंड लॉबिंग केले आहे. उमेदवारी आणि जागा वाटप या पार्श्वभूमीवर, दिल्ली आणि मुंबईत घडणाऱ्या प्रत्येक घडामोडींवर इच्छुकांसह त्यांच्या समर्थकांचे बारीक लक्ष आहे. कोणत्याही परिस्थितीत उमेदवारी हवी, अशी मनिषा बाळगून असलेल्या इच्छुकांचे टेन्शन हर घडीला वाढत असून त्यांना जेवण गोड लागेना झाले आहे. (पान ७ वर)

### नाम मालूम होगा? फिरसे नाईक-निंबाळकर !

माढा लोकसभेच्या भाजपा उमेदवारीवरुन संघर्षाची लढाई आता हातघाईवर आली आहे. विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर आणि मोहिते-पाटील यांच्या समर्थकांनी उमेदवारीवरुन प्रचंड रान पेटविले आहे. दोघांचे समर्थक सोशल मीडियावरुन एकमेकांना भिडताहेत. समर्थकांमध्ये एकेरी भाषा वापरत उमेदवारीवरुन दावे-प्रतिदावे केले जात आहे. मुद्यांची गोष्ट गुद्यावर यायची राहिली आहे. दरम्यान, उमेदवारीच्या सर्वच निकषांमध्ये विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर हे उजवे असून भाजपाचे महाराष्ट्रातील पार्लमेंटरी बोर्डाचे सदस्य देवेंद्र फडणवीस यांचे समर्थन त्यांना आहे. फलटणकर नाईक-निंबाळकर यांच्याच उमेदवारीवर शिक्कामोर्तब होऊ शकते, अशी माहिती सुत्रांकडून मिळतेय.

### जागा वाटपानंतर उमेदवारीची लॉटरी

सध्या जागा वाटपावरुन प्रचंड खेचाखेची सुरु आहे. अनेक नाट्यमय घडामोडी घडत आहेत. तथापि, जागा वाटपांचे नाट्य अजून दोन-तीन दिवस चालेल. जागा वाटप फायनल झाल्यानंतर भाजपाच्या उमेदवारीची लॉटरी फुटेल, असे सांगण्यात आले.

### प्रणिती शिंदेंबद्दल भाजपाला आशा

आमदार प्रणिती शिंदे यांच्या प्रवेशाबद्दल भाजपाला अजूनही आशा आहे. राष्ट्रीय स्तरावरुन त्यांच्या भाजपा प्रवेशासाठी अजूनी प्रयत्न सुरु आहेत. प्रणिती यांच्या प्रवेशाचे घोडे अडल्याने सोलापूरच्या उमेदवारीचे नाव निश्चित केले जात नसल्याचे सुत्रांनी सांगितले. सुशीलकुमार शिंदे यांनी सुरवातीला काँग्रेसमध्येच थांबावे, प्रणिती यांचा भाजपा प्रवेश करुन घ्यावा. दुनंतर सुशीलकुमारांनी 'कमळ' हाती घ्यावे. भाजपा प्रवेशाचा मोहिते-पाटील पॅटर्न राबवावा, अशी गळदेखील शिंदे यांना घातली जात असल्याचेही सूत्रांनी स्पष्ट केले.

### साबळे, सातपुते, बनसोडे अन् वाघमारे आघाडीवर

सोलापूर लोकसभेसाठी भाजपाकडून इच्छुकांची असलेली यादी लांबलचक असली तरी सध्या स्थितीत प्रदेश आणि राष्ट्रीय भाजपामध्ये माजी खासदार अमर साबळे, आमदार राम सातपुते, सनदी अधिकारी भारत वाघमारे आणि माजी खासदार ॲड. शरद बनसोडे यांची नावे सर्वात आघाडीवर आहेत. उत्तम जानकर यांचे नाव मात्र आता सर्वात मागे गेल्याचे सांगण्यात आले.



प्रयत्न करुनदेखील प्रणिती शिंदे यांचा भाजपा प्रवेश नाही झाल्यास दुसरा पर्याय वरिष्ठांनी डोळ्यासमोर ठेवल्याचे सुत्रांनी सांगितले. सोलापूर लोकसभेच्या आखाड्यात युवा नेतृत्व म्हणून प्रणिती शिंदे या महासंग्रामात असताना त्यांना फाईट देण्यासाठी युवा नेतृत्व म्हणून माळशिरसचे आमदार राम सातपुते यांना उतरविण्याची तयारी भाजपाने केल्याची माहिती देण्यात आली. सातपुते यांचे गॉडफादर हे देवेंद्र फडणवीस आहेत. प्रणिती यांच्या विरोधात सातपुते यांना ते उतरवू शकताते. त्यातून राम सातपुते यांचे सोलापूर लोकसभेसाठी पारडे जड असल्याची माहिती प्रदेश भाजपाच्या वरिष्ठ सुत्रांनी दिली.

**प्रणितींना फाईट देणारा युवा चेहरा म्हणून सातपुते अग्रस्थानी**

# सोलापूरचे पाणी पिण्यायोग्यच!

- नीरीच्या शास्त्रज्ञांचा अहवाल पालिकेला सादर

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूरला होणारा पाणीपुरवठा हा पिण्यायोग्य असल्याचा अहवाला नॅशनल एन्वीरमेंटल इंजिनीरिंग रिसर्च इन्स्टिट्यूटने दिला असल्याचे महापालिकेकडून स्पष्ट करण्यात आले. मात्र, खबरदारीचा उपाय म्हणून पाणी उकळून पिण्याचे आवाहन करण्यात आले.



शहरास सोरेगांव जलशुध्दीकरण केंद्र येथून मागील १० ते १२ दिवसापासून पुरवठा होणाऱ्या पाण्याचा रंग फिकट पिवळसर येत असल्याने त्याची तपासणी करून आवश्यक उपाययोजना करून त्याचे निराकारण करण्यात आलेले आहे. यामुळे नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

उजनी धरणात सध्याला अत्यल्प पाणी साठा असल्याने व या वर्षी धरण संपूर्ण क्षमतेने भरले नसल्याने धरणातील गेल्या वर्षीचे पाणी असल्याने त्यामध्ये शेवाळचे प्रमाण खुप असून या कच्च्या पाण्याची गुणवत्ता खराब असल्याचे निदर्शनास आले आहे. नदीमध्ये १० ते १२ मार्च रोजी पुढील आवर्तन सोडण्यात येणार असल्याने धरणातील पाण्याची गुणवत्ता आणखी खालवण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने पुर्व उपाययोजना करणेकरीता 'नीरी'च्या शास्त्रज्ञांना बोलावून दि.२ मार्च व दि.3 मार्च (पान ७ वर)

# कोणी काही म्हणो यंदा सरकार बदलणार!

- बोरी उमरगेच्या थंडीयात्रेतील भाकणुकीने अनेकांच्या भूवया उंचावल्या



**सोलापूर/अक्कलकोट**

यंदा देशात सर्वत्र पाऊस मात्र चांगला होणार असून खरीपावेळी जास्त पाऊस पडल्याने चांगल्या सुपीक जमिनींपेक्षा डोंगराळ जमीन जास्त पिकणार आहे. कोणी किती जरी हेच सरकार येणार असे म्हणत असले तरी येणारे निवडणुकित सरकार बदलणार आहे. श्री लक्ष्मी माता थंडी यात्रा भाकणुकिमध्ये सांगितले आहे.

तालुक्यातील बोरी उमरगे येथे श्री लक्ष्मी माता थंडी यात्रा भाकणुक अनादी काळापासून चालत आलेली असून आज पर्यंत भाकणुक तंतोतंत खरे ठरले आहे. या पूर्वी भाकणुकि मध्ये स्त्री राज्य येणार म्हणून सांगितले होते तेव्हा इंदिरा गांधीच सरकार आले.संन्याशी राज्य येणार म्हणून सांगितले होते तेव्हा अटल बिहारी वाजपेयी सरकार आले. भगवा राज्य येणार म्हणून सांगितले होते तेव्हा मोदी सरकार आले. यंदा मात्र कोणी किती जरी हेच सरकार येणार असे म्हणत असेल तरी येणारे निवडणुकित सरकार बदलणार असल्याचे सांगितले आहे.


यंदा दोन्ही पाऊस उत्तम असून खरिपाचे वेळी अती पाऊस होणार



असल्याने चागलं सुपीक जमीनीमध्ये ओला दुष्काळ परस्थिती निर्माण होणार आहे.शेतकऱ्यांनी तुरीला जास्त भाव मिळेल म्हणून तुर पेरू नका.कीड आणि जंतूचे संसर्ग रोग जास्त होणार असल्याने तुरीचे पीक मोठ्या प्रमाणात वाया जाणार आहे. यापेक्षा हरभराला तुरीपेक्षा चांगला भाव मिळणार असल्याने हरभरा पेरणी केल्यास फायदा होऊ शकतो. ज्वारीला दोन तीन प्रकारे भाव मिळणार असून कडबा मात्र स्वस्त होणार आहे. सोन्याचे भाव कमी जास्त होऊन स्थिर भाव राहणार आहे. बैल, म्हैस, शेळी, महागणार (पान ७ वर)

# शरद पवार म्हणतात मला...

- दादागिरीच्या वाटेला मी जात पण कोणी त्या दिशेने गेला तर सोडत नाही



**लोणावळा :** आमच्याकडे येणाऱ्या कार्यकर्त्यांना दादागिरी करता. त्या मार्गाने मी जात नाही. पण कोणी त्या मार्गाने गेले तर मी त्याला सोडतही नाही. शरद पवार म्हणतात मला, अशा शब्दात ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रबादीचे संस्थापक शरद पवार यांनी आमदार सुनील शेळके यांना सज्जड दम भरला.

शरद पवार गटाने लोणावळ्यात कार्यकर्ता मेळाव्या शरद पवार बोलत होते. शरद पवार यांनी आज मावळमधील त्यांच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. लोणावळ्यात पोहोचल्यावर कार्यकर्त्यांनी तुतारी फुंकून शरद पवार यांचे जंगी स्वागत केले. मोठ्या क्रेनच्या सहाय्याने शरद पवारांना हार घालण्यात आला. तसेच जेसीबीद्वारे त्यांच्यावर फुलांची उधळण करण्यात आली. दरम्यान, अजित पवार गटातील लोणावळ्यातील १०० हून अधिक कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी आज शरद पवारांच्या उपस्थितीत त्यांच्या पक्षात प्रवेश केला.

पवार यांनी केंद्र सरकार आणि राज्यातील शिंदे सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. शरद पवार म्हणाले, देशात भाजपाकडून सत्तेचा गैरवापर होत आहे. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना तुरुंगात डांबले आहे. आता ते दिल्लीचे (पान ७ वर)

## नदीपात्रात आजपासून उजनीतील पाणी

**पंढरपूर :** संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर व उपलब्ध पाणीसाठा जुलै अखेरपर्यंत पुरवठा करण्याच्या दृष्टीने उजनी धरणासह इतर प्रकल्पातील पाणी साठे पिण्यासाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. ८ मार्च रोजी उजनीतून भीमा नदी पात्रात पाणी सोडणार आहेत. हे पाणी शेवटपर्यंत पोहोचण्यासाठी नदीकाठचा वीजपुरवठा बंद असेल. बेकायदा पाणी उपसा करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येणार आहे.

# २८ अट्टल जुगारी अक्कलकोटमध्ये जेरबंद

**सोलापूर/अक्कलकोट**

तालुक्यातील हसापूर शिवारातील हारूण फुलारी याच्या शेतातील अंदर-बाहर जुगार अड्ड्यावर प्रशिक्षणार्थी सहायक पोलिस अधिक्षकांच्या विशेष पथकाने धाड टाकून सुमारे २८ जुगारांना अटक केली. ही कारवाई मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास करण्यात आली असून यामध्ये २ लाख ४२ हजार २४० रुपयांची रोकड, १२ दुचाकी, चारचाकी आणि २८ मोबाईल असा लाखो रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



संजय पिसे (रा. चौपाड, सोलापूर), सुरेश आवताडे (रा. निराळे वस्ती, सोलापूर), अशपाक जमादार (रा. मैंदर्गी), मनोहर सरवदे (रा. मुराराजी पेठ, मारूती मंदीरशेजारी, सोलापूर), सागर देवकर (रा. तरटी नाका पोलिस चौकीच्या मार्ग, वडार गल्ली, सोलापूर), बिरप्पा बेळळे (रा. अंबाबाई मंदीरजवळ, बुधवार पेठ), बसवराज हरवाळकर (रा. बुधवार पेठ, किणी रोड), नितीन पाटील (रा. स्वामी समर्थ नगर, स्टेशन रोड), सागर मोरे (रा. मुरारजी पेठ, लक्ष्मी मंदीरजवळ, निराळे वस्ती, सोलापूर), महेश भोसले (रा. राम गल्ली, फत्तेसिंह चौक), अजय माने (रा. जुनी लक्ष्मी चाळ, डोणगाव रोड, सोलापूर), ऋषिकेश मोरे (रा. निराळे वस्ती, मुरारजी पेठ, सोलापूर), रमेश चौधरी (रा. ब-हाणपूर, जि. गुलबर्गा), सतीश राठोड (रा. शिवाजी नगर, स्टेशन रोड), साहेबलाल मकानदार (रा. मौलाली गल्ली), सतिश राठोड (पान ७ वर)

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




आज सुट्टी ! मला पण सेलिब्रेशन करायचाय !

| कल्याण |
| --- |
| 124-72-110 |

| मुंबई |
| --- |
| 290-11-344 |




# महसूलच्या धावपळीतून मॅरेथॉनची धाव!

**सोलापूर/दीपक शिराळकर**

**जिल्हाधिकाऱ्यांनी मॅरेथॉन पूर्ण केली, हे वाक्य उच्चारले तरी काही चुकल्यासारखे वाटते. पण हे खरं आहे. ही किमया साधली आहे अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांनी. पूर्ण मॅरेथॉन पूर्ण करणे हे तर शिवधनुच्य पेलण्या इतके कठीण. पण, व्यायामासाठी धावण्यापासूण सुरू झालेला छंद त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आणि वर्षभरात एखादी तरी मॅरेथॉन पूर्ण करण्याचा अनोखा प्रयत्न त्यांनी यशस्वीपणे पेलला.**

महसूल प्रशासनातील काम म्हणजे कामाच्या तासांचा हिशेबच नसतो. या साऱ्या आव्हानांचा मुकाबला करण्याचे एकमेव साधन म्हणजे धावणे. त्या म्हणतात, 'तुम्ही धावत असाल तर आव्हानांना सामोरे जाण्याचे मानसिक धैर्य येते. तुम्ही आव्हानांपासून पळ काढत नाही.' खरे तर मोनिका

**अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांची अनोखी यशोगाथा!!**




सिंह यांचे मोठे बंधू पोलिस उपनिरीक्षकाच्या परीक्षेची तयारी करायचे. त्याच्या सरावाचा भाग म्हणून ते धावण्याचा व्यायाम करायचे. भावाचे पाहून त्याही व्यायाम करण्याकडे आकृष्ट झाल्या. अनेक मुलींप्रमाणे (पान ७ वर)

**महिला दिन तरच यशस्वी :** महिलांवर सर्व गोष्टीची जबाबदारी असते. कुटुंबाची, लेकरांची यामुळे महिला वेळ काढू शकत नाही. पुरुषांनी महिलांविषयी बघण्याचा दष्टीकोन बदलला पाहिजे. त्यांची मानसिकता बदली पाहिजे तरच महिला आरोग्यवान होतील. घरात पूरक वातावरण निर्मितीला मदत करणार नाहीत तेव्हापर्यंत महिला दिन यशस्वी होणार नाही, अशी खंतही मोनिका सिंह व्यक्त करतात.

**थेट मॅरेथॉनमध्येच पळू नका :** थेट मॅरेथॉन स्पर्धेत धावण्याचा प्रयत्न अनेक जण करतात. असे अजिबात करू नका.त्यातून गुडघेदुखी, चक्कर, पाय दुखणे अशा दुखापतींची शक्यता बळावते. वेळेवर आहार, विश्रांती, झोप घ्या या गोष्टी आवश्यक आहेत.

**लंडन मॅरेथॉनमध्ये यशस्वी :** मॅरेथॉनच्या विश्वात सहा स्पर्धांचा स्वत:चा असा एक आगळा सन्मान आहे. त्यापैकी एक म्हणजे लंडन मॅरेथॉन. त्या लंडन मॅरेथॉन यामध्येही मी सहभाग नोंदवला आहे. जगातील बेस्ट मॅरेथॉन म्हणून, लंडन मॅरेथॉन ला ओळखले जाते. आपल्या इकडे होणाऱ्या मॅरेथॉनपेक्षा तिथे सामान्यांचाही सपोर्ट, प्रतिसाद, उत्साह खूप असतो, असं निरीक्षणही मोनिका सिंह नोंदवतात.

**सहकारी धावू लागतात... :** मी धावण्याचा सराव नियमित करते. आठवड्यात ५० ते ६० किमी अंतर मी धावत असते. साहजिकच कार्यालयातही त्यावर अनेकदा चर्चा होते. त्यातून अनेक सहकारी धावण्याच्या व्यायामाकडे वळतात. अनेक ठिकाणी माझ्या प्रेरणेतून धावण्याच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. समाजात क्रीडा संस्कृती तयार होते. हे मी समाजाचे देणे देत असते, अशी कृतज्ञतेची भावना त्या व्ययक्त करतात.